
# ६० वा

# वार्षिक अहवाल
## २०१८-२०१९




## डॉ. आप्पासाहेब ऊर्फ सा.रे.पाटील
## जयसिंगपूर-उदगांव सहकारी बँक लि., जयसिंगपूर.

पोस्ट - जयसिंगपूर-४१६ १०१ ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.

# आशिर्वाद



## स्व. डॉ. आप्पासाहेब उर्फ सा. रे. पाटील साहेब

**संस्थापक : डॉ. आप्पासाहेब उर्फ सा.रे.पाटील जयसिंगपूर उदगांव सह. बँक लि., जयसिंगपूर**

## आमचे मार्गदर्शक



# उद्यानपंडीत मा. श्री. गणपतराव पाटील

# विनम्र श्रध्दांजली

अहवाल सालात आपल्या बँकेचे जे सभासद,
हितचिंतक, स्त्री-पुरुष बांधव, तसेच देशाच्या विविध भागात नक्षलवाद्यांनी
केलेल्या हल्ल्यात मयत झालेले बांधव, देशाच्या सिमेचे रक्षण करताना
हुतात्मा झालेले जवान, थोर नेते, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक, साहित्यिक,
शिक्षणतज्ञ, बँकिंग क्षेत्रातील व्यक्ती, कलावंत, सामाजिक कार्यकर्ते,
सभासद, ठेवीदार, ज्ञात व अज्ञात व्यक्ती मयत झालेल्या आहेत,
त्या सर्वांच्या कुटुंबियांच्या दु:खात बँक सहभागी होत असून मृत
व्यक्तींच्या स्मृतीस मी आपले सर्वांचे वतीने भावपूर्ण विनम्र श्रध्दांजली
अर्पण करतो. त्यांचे आत्म्यास सद्गती मिळो हिच परमेश्वरचरणी प्रार्थना...!

# डॉ. आप्पासाहेब उर्फ सा. रे. पाटील जयसिंगपूर उदगांव सहकारी बँक लि., जयसिंगपूर.

## ६० वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

डॉ. आप्पासाहेब उर्फ सा. रे. पाटील जयसिंगपूर – उदगांव सहकारी बँक लि. जयसिंगपूर या बँकेची सन २०१८–१९ वर्षाकरिता ६० वी वार्षिक सर्व साधारण सभा शुक्रवार दिनांक २०–०९–२०१९ ई. रोजी दुपारी २.०० वाजता, मर्चन्ट असोसिएशन हॉल, ९ वी गल्ली, जयसिंगपूर येथे खालील विषयावर विचार विनिमय करणेकरिता बोलविणेत येत आहे. तरी सदर सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

### * सभेपुढील विषय *

१) मागील दिनांक २०/०३/२०१९ ई. रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचा सभा वृत्तांत वाचून कायम करणे.

२) मा. संचालक मंडळाने दिनांक ३१/०३/२०१९ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा शासकीय लेखापरिक्षकांनी सादर केलेला अहवाल, ताळेबंद व नफा–तोटापत्रक स्वीकृत करणे.

३) सन २०१७–२०१८ या सालाचे शासकीय लेखापरीक्षण दोष दुरुस्ती अहवालाची वाचून नोंद घेणे.

४) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०१९–२०२० चे अंदाज पत्रकास मंजूरी देणे व सन २०१८–२०१९ या सालात अंदाजपत्रकापेक्षा कमी–जादा झालेल्या उत्पन्न व खर्चास मंजूरी देणे.

५) सन २०१८–२०१९ या सालातील झालेल्या निव्वळ नफा विभागणीस मंजूरी देणे व लाभांश जाहिर करणे.

६) सन २०२०–२०२१ या वर्षाकरीता अंतर्गत, कंकरंट हिशोब तपासणीस यांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

७) सन २०१९–२०२० या वर्षाकरीता शासकीय लेखापरीक्षक यांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

८) सन २०१८–२०१९ या सालातील शासकीय लेखापरीक्षक सी. ए. मे. पोवार सामंत आणि जाधव यांचेकडून मिळालेला लेखापरीक्षण अहवाल वाचून नोंद घेणे.

९) बँकेच्या मा. संचालक मंडळ सदस्य व त्यांच्या नातेवाईकांना सन २०१८–२०१९ या आर्थिक वर्षात दिलेल्या कर्जाची माहिती घेणे.

१०) सन २०१९–२०२० या वर्षाकरीता बाहेरील भांडवल उभारणेची कमाल मर्यादा ठरविणे.

११) सन २०१८–२०१९ या आर्थिक वर्षात संचालक मंडळाच्या मान्यतेने तडजोडीने केलेल्या थकीत कर्ज वसुलीस मंजूरी देणे.

१२) दि.२० मार्च २०१९ ई.रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत मल्टीस्टेट विषयी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेऊन निर्णय घेणे

१३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरुस्तीस मंजूरी देणे.

१४) बँकेच्या सभासदांना प्रशिक्षण देणेबाबत विचार विनियम करणे.

१५) बँकेने केलेल्या व करावयाच्या भांडवली गुंतवणुकीस मान्यता देणे.

१६) सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस सभासदांच्या अनुपस्थितीस रजा मंजूर करणेबाबत विचार करणे.

१७) मे. अध्यक्षसो यांचे परवानगीने आयत्यावेळी येणारे विषयांवर चर्चा करणे.

**व्ही. ए. कदम**
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी,
मा. संचालक मंडळाच्या आदेशानुसार

स्थळ – जयसिंगपूर.
दिनांक– २२.०८.२०१९

### * सभासदांना नम्र सूचना *

१) बँकेच्या कामाकाजासंबधी काही प्रश्न विचारावयाचे असतील तर सभासदानी दिनांक १६/०९/२०१९ पूर्वी बँकेकडे लेखी कळवावे. २) गणपुर्ती अभावी सभा तहकूब झालेस त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सभा भरेल व त्यावेळी गणसंख्येची आवश्यकता भासणार नाही. ३) आपला पत्ता बदलला असलेस नवीन पत्ता प्रधानकार्यालयाकडे त्वरीत कळवावा. तसेच लाभांश बँकेच्या कामकाजाच्या वेळेत घेऊन जावे. ४) सभासदांनी आपला लाभांश जमा करणेसाठी नजीकच्या शाखेत सेव्हींग खाते सुरु करावे. तसेच तीन वर्षावरील डिव्हीडंड जे सभासद दि.३१/१२/२०१९ पर्यंत नेणार नाहीत. अशा सभासदांचे डिव्हीडंड रिझर्व्ह फंडास वर्ग केले जाईल. ५) अहवालाच्या व हिशोब पत्रकाच्या प्रती प्रधान कार्यालयात व शाखा कार्यालय येथे सभासदांचे माहितीसाठी ठेवणेत आलेल्या आहेत. तसेच www.jusbbank.com या वेबसाईट वर बँकेचा अहवाल पहावयास मिळेल.



# अध्यक्षांचे मनोगत ..

**सन्माननीय बंधू-भगिनीनो**
**सस्नेह नमस्कार,**

आपल्या बँकेच्या ६० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस आपण अगत्यपूर्वक उपस्थित राहिलात त्याबद्दल मी आपले सर्वांचे व्यक्तिश: व संचालक मंडळाचेवतीने मन:पुर्वक हार्दिक स्वागत करीत आहे. सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाची कामगिरी व फळ निष्पती ठरवणारा दिवस ३१ मार्च २०१९ या अखेरचा वार्षिक अहवाल व आर्थिक पत्रके आपणापुढे सादर करताना मला मनस्वी आनंद होत आहे.

बँकेचे संस्थापक, मार्गदर्शक व माजी आमदार स्व. डॉ. आप्पासाहेब उर्फ सा. रे. पाटील साहेब यांचे स्वप्न पूर्तीसाठी पुढे आपल्या मदतीने वाटचाल करीत आहोत. बँकेची स्थापना सन १९६० साली झाली असून बँकेने हिरक महोत्सवाकडे वाटचाल केली आहे. बँकेने सहकार चळवळीच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या उत्कर्षाचे ध्येय स्विकारुन शेती, व्यापार व औद्योगिककरणाचा विकास करण्याच्या दृष्टीने कर्जपुरवठा केला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील कष्टकरी बहुजन समाजाच्या विकासासाठी सातत्याने कार्य केले आहे. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात बँक एक नामांकित व अग्रगण्य म्हणून नावारुपास आलेली आहे. बँकेच्या प्रगतीमध्ये बँकेचे सभासद, असंख्य ग्राहक व हितचिंतक यांचा सिंहाचा वाटा आहे. माजी आमदार स्व. डॉ.आप्पासाहेब उर्फ सा.रे.पाटील साहेब यांनी लावलेले बँकरुपी छोटेसे रोपटे आज उद्यानपंडीत मा.श्री.गणपतराव पाटील (दादा) चेअरमन, श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., शिरोळ यांच्या मार्गदर्शनामुळे त्याचे आज एका वटवृक्षात रुपांतर झाले आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत वाढलेल्या जागतिक मंदीचा परिणाम आपल्या देशातही मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत नविन उद्योग व व्यवसायाची निर्मिती थांबली गेली या सर्वांचा अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रावर विपरीत परिणाम झाल्यामुळे रोजगार, व्यापार व औद्योगिक उत्पादन दर यांचा बँकिंग क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला. परिणामी बँकांचा अनुत्पादित कर्जाच्या प्रमाणामध्ये वाढ झाली. अशा प्रतिकुल परिस्थितीमध्येही आपल्या बँकेने अनुउत्पादित कर्जाचे प्रमाणावर नियंत्रण ठेवून सुयश मिळवले आहे.

बँकेचे सध्याचे कार्यक्षेत्र कोल्हापूर व सांगली जिल्हा आहे. सध्या बँकेच्या १४ शाखा आहेत. बँकेचा विस्तार वाढवण्याच्या दृष्टीने बँक आता मल्टीस्टेट करुन कर्नाटक राज्यात विस्तार वाढविण्याच्या दृष्टीने बेळगांवची अक्कमहादेवी महिला सहकारी बँक लि., बेळगांवी या बँकेचे आपल्या बँकेत विलीनीकरण करण्याचा प्रस्ताव रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे पाठविणेत आला आहे. मला खात्री आहे आपली बँक लवकरच मल्टीस्टेट बँकेचा दर्जा प्राप्त करेल.

**सन २०१८-२०१९ च्या आर्थिक वर्षाचा आढावा**

अहवाल सालामध्ये बँकेने दरवर्षीप्रमाणे वाटचाल सुरू ठेवली असुन ही बाब तुलनात्मक आकडेवारीवरून लक्षात येईल.

**बँकेची तुलनात्मक सांपत्तीक स्थिती.**

| अ.नं | तपशील | ३१/०३/२०१७ | ३१/०३/२०१८ | ३१/०३/२०१९ |
|---|---|---|---|---|
| १. | सभासद संख्या | ११३९५ | १२१०० | १२८९४ |
| २. | अधिकृत भाग भांडवल | १०,००,००,०००/- | १०,००,००,०००/- | १०,००,००,०००/- |
| ३. | वसुल भाग भांडवल | ६,२९,३२,७७५/- | ६,९४,८२,८५०/- | ८,३५,५१,६५०/- |
| ४. | राखीव व इतर निधी | १०,८५,४१,६९०/- | ११,७६,११,७५३.००/- | १२,८९,६३,२६३.२५/- |
| ५. | ठेवी | २,१२,९०,४६,६१७/- | २,२८,८१,८१,१९९.४५/- | २,६५,७५,३३,३६०.६९/- |
| ६. | कर्जे | ८९,७५,००,१४६/- | १,०८,४७,६८,३४५.१०/- | १,५०,९६,१८,१२४.८२/- |
| ७. | गुंतवणुक | १,२३,४६,४४,४५०/- | १,१५,४४,५५,९३३.३७/- | १,१२,४७,८२,३८६.९७/- |
| ८. | नफा | १,४०,५५,७८०/- | १,५०,२७,३३१.५४/- | १,६०,५७,३३९.०९/- |
| ९. | ढोबळ एन.पी.ए. | ५.९१% | ३.८८% | ३.२२% |
| १०. | निव्वळ एन.पी.ए | १.२१% | ०% | ०.२५% |
| ११. | भांडवल पर्याप्तता | १५.७७% | १३.९३% | १३.२५% |
| १२. | लांभाश | १२.००% | १०.००% | ११.००% (शिफारस) |
| १३. | ऑडीट वर्ग | ''अ'' | ''अ'' | ''अ'' |

**सभासद –**

अहवाल सालात गतवर्षीच्या १२१०० सभासदात ८८५ ने वाढ झाली असून ९१ सभासद कमी झालेने वर्षाअखेर बँकेचे नियमीत सभासद संख्या १२,८९४ इतकी आहे. अहवालसालात वसुल भाग भांडवलामध्ये रु. १४०.६९ लाख इतकी वाढ झाली आहे.

**भाग भांडवल:–**

बँकेचे अधिकृत भागभांडवल रूपये दहा कोटींचे असून अहवाल साल अखेर वसूल भागभांडवल रूपये ८,३५,५१,६५०/– इतके आहे. भाग भांडवल वाढीचे शेकडा प्रमाण २०.२५ टक्के आहे.

सहकार कायद्यातील सुधारणेनुसार बँकेच्या प्रत्येक भागाची किंमत रू.१००/– वरून रू.१०००/– च्या पटीत तातडीने करून घ्यावा.

**राखीव व इतर निधी :–**

बँकेचा आर्थिक पाया भक्कम होण्यासाठी भागंभाडवलाबरोबरच राखीव व इतर निधीची तरतूद असणे तितकेच महत्वाचे आहे. ३१ मार्च २०१९ अखेर गगांजळी रू.४,२८,७३,८७५.७७ व इतर निधी रू. ८,६०,८९,३८७.४८ असे मिळून एकूण स्वनिधी रू.१२,८९,६३,२६३.२५ असा आहे. बदलत्या धोरणांना सक्षमपणे सामोरे जात दरवर्षीच्या नफ्यातून अधिकतर भाग निधींकडे वळवून बँकेने निधीमध्ये वाढ केलेली आहे. बँकेचा आर्थिक पाया किती भक्कम आहे यावरच बँकेचे अस्तित्व व सभासदांचे हिताचे रक्षण अवलंबून असते.

**भांडवल पर्याप्तता –**

रिझर्व बँक ऑफ इंडीयाच्या निकषानुसार भांडवल जोखीम पर्याप्तता प्रमाण बँकेस किमान ९.००% असताना सदरचे प्रमाण आपल्या बँकेने १३.२५% इतके राखले आहे. यावरून आपल्या बँकेची आर्थिक सक्षमता दिसुन येते.

**ठेवी –**

जनमाणसातील विश्वास हाच खरा बँकेच्या प्रतिमेचा सन्मान असतो. या विश्वासाचे द्योतक म्हणजे बँकेने आपल्या नावलौकीकावर मिळविलेल्या ठेवी होय.

आर्थिक स्थैर्याच्या जोरावर समाजामध्ये विश्वासार्हता निर्माण केलेने ठेवीचे व्याजदर अन्य बँकांच्या तुलनेने कमी ठेवूनही बँकेच्या ठेवीमध्ये वाढ झालेली आहे. दि.३१.०३.२०१८ रोजी बँकेच्या एकूण ठेवी रू.२२८८१.८१ लाख इतक्या होत्या वर्षभरात त्यामध्ये रू.३६९३.५२ लाखाची वाढ होऊन दि.३१.०३.२०१९ अखेरीस बँकेच्या ठेवी रू.२६५७५.३३ लाख इतक्या झाल्या आहेत. ठेव वाढीचा वेग १६.१४ टक्के इतका आहे. ठेवीदारांच्या ठेव रक्कमेच्या सुरक्षेसाठी ठेवींचा विमा डि.आय.सी.जी.सी यांचेकडे उतरविला असून त्यांचा विमा हप्ता नियमितपणे प्रत्येक सहामाहीस आगवू भरला जातो

**कर्जे –**

बँकेच्या ठेवी जितक्या जास्त तितकी बँक सुदृढ ही संकल्पना आता बदललेली आहे. आता बँकेच्या व्यवसायास महत्व प्राप्त झालेले आहे. व्यवसाय म्हणजे ठेवी अधिक कर्जे होय. त्यातही कर्जे अधिक महत्वाची ठरतात. दि.३१.०३.२०१८ रोजी बँकेची एकूण कर्जे रू.१०८४७.६८ लाख इतकी होती. अहवाल सालात त्यात रू.४२४८.५० लाखांची वाढ होऊन अहवाल साल अखेर कर्जे रू.१५०९६.१८ लाख इतकी झाली आहेत. सभासदांना त्यांच्या आर्थिक गरजा लक्षात घेऊन शेती, व्यवसाय व उद्योग वाढीसाठी तसेच कौटुंबिक कारणासाठी माफक व्याजदरात कर्ज पुरवठा करुन त्याचे जीवनमान उंचावणेचा प्रयत्न केला आहे.

**अग्रक्रम क्षेत्रास कर्जपुरवठा –**

आपल्या बँकेने रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे अग्रक्रम क्षेत्रास रू. ९६४६.०० लाख इतका कर्ज पुरवठा केला असून त्याचे एकूण येणे कर्जाशी शेकडा प्रमाण ६३.९० टक्के आहे. तसेच दुर्बल घटकांना रू. ४४२८.७८ लाख इतका कर्ज पुरवठा केला असून त्याचे अग्रक्रम कर्जाशी शेकडा प्रमाण ४५.९१ टक्के इतका आहे.

**गुंतवणूक –**

कर्जव्यवहारानंतर ताळेबंदाची जिंदगी दर्शवणारी दुसरी महत्वाची बाजु म्हणजे गुंतवणूक, गुंतवणूक ही कर्ज व्यवहाराइतकी फायदेशीर नसली तरी रिझर्व्ह बँकेच्या CRR व SLR बाबतच्या तरतुदीचे काटेकोर पालन करून गुंतवणूकीचे व्यवस्थापन केले आहे. रिझर्व्ह बँकेच्या सुधारित नियमानुसार SLR ची गुंतवणूक सरकारी कर्जरोख्यात असणे आवश्यक आहे. बँकेने या आदेशाचीही पुर्तता केली आहे. त्यामुळे सरकारी कर्जरोख्याच्या व्यवहाराला महत्व प्राप्त होऊ लागले आहे. गतवर्षी बँकेची एकूण गुंतवणूक रू.११,५४४.५६ लाख इतकी होती. तसेच म्युच्यूअल फंडात गुंतणूक करुन व सरकारी कर्जरोख्याची खरेदी–विक्री करून बँकेने अहवाल सालात एकूण रू.१३७.७८ लाख इतका नफा मिळविला आहे. कोअर बँकेकडील उपलब्ध अतिरिक्त निधीचे सुयोग्य नियोजन करणे शक्य झाले आहे.

**संगणकीकरण व तंत्रज्ञान –**

बँकेने प्रधान कार्यालय जयसिंगपूर येथील मुख्य इमारतीत अद्यावत व सुसज्ज असे डाटा सेंटर उभारले आहे. कोअर बँकिंग सोल्युशन (CBS) चे कामकाज पूर्ण झालेले आहे. सर्व शाखा डाटा सेंटरला जोडण्यात आलेल्या असुन सर्व शाखांकरिता Centralized Activity कार्यान्वीत झालेल्या आहेत. याचा सर्वच ग्राहकांना लाभ होत आहे. या सुविधाव्दारे ग्राहकांना बँकेच्या कोणत्याही शाखेतून बँकिंग सुविधा मिळत आहे. बँकेने आय.सी.आय.सी.आय.बँकेमार्फत RTGS व NEFT ची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.

बँक (NPCI) कार्यप्रणाली होस टू होस (H2H) मध्ये समाविष्ठ झालेली असून बँकेच्या ग्राहकांना रुपे एटीएम कार्डद्वारे कोणत्याही बँकेच्या ए.टी.एम मधून भारतात कोठेही पैसे काढता येतात तसेच मोबाईल बँकिंग सुविधा बँकेच्या खातेदारांना उपलब्ध करुन दिलेली आहे.

**नफा विभागणी –**

अहवाल सालामध्ये बँकेस सर्व तरतुदी वजा जाता निव्वळ नफा रू.१,६०,५७,३९९.०९ इतका झाला आहे. नफ्याची विभागणी पुढील प्रमाणे करणेत यावी अशी संचालक मंडळाची सर्वसाधारण सभेस शिफारस आहे.

## नफा विभागणी शिफारस

| अ. नं. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १. | रिझर्व्ह फंड २५% | ₹ ४०,१५,०००.०० |
| २. | जनरल रिझर्व्ह फंड | ११,००,०००.०० |
| ३. | लाभांश ११% (शिफारस) | ७९,८०,८८६.०० |
| ४. | निवडणुक निधी | २५,०००.०० |
| ५. | शिक्षण निधी | १,००,०००.०० |
| ६. | गुंतवणूक चढउतार निधी | १५,००,०००.०० |
| ७. | तंत्रज्ञान विकास निधी | १,००,०००.०० |
| ८. | इमारत निधी | १२,३६,५१३.०९ |
| | **एकूण –** | **₹ १,६०,५७,३९९.०९** |

**अनुत्पादक कर्जे (N. P. A.) व तरतुद –**

बँकेच्या एकूण येणे कर्जबाकीपैकी उत्पन्न क्षमता नसलेल्या (एन.पी.ए) कर्जाचे ढोबळ प्रमाण ३.२२ टक्के आहे. तर निव्वळ प्रमाण ०.२५ टक्के आहे.

थकबाकी वसुलीसाठी बँकेचे संचालक मंडळ व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतलेले आहेत. थकबाकी वसुलीसाठी सर्व योग्य व सनदशीर मार्गाचा अवलंब करुन, थकबाकीदारांना समक्ष भेटून, लेखी, तोंडी सुचना देऊन, त्यांच्या अडचणी समजाऊन घेऊन, थकबाकी कमी करणेचा प्रामाणिक प्रयत्न आम्ही केला आहे. मात्र यास प्रतिसाद न देणाऱ्या थकबाकीदारांवर नाईलाजास्तव कायदेशीर कारवाई, जप्ती, सक्तीने वसुली यासारखे मानहानीकारक कटू प्रसंग येतात. अशा प्रसंगी यापुढे बँकेने अत्यंत कठोर निर्णय घेऊन त्याची ठामपणे अंमलबजावणी करणेचा निर्णय घेतला आहे. असा प्रसंग आपणावर येऊ नये यासाठी थकबाकीदारांनी आपली थकबाकी सत्वर भरुन बँकेच्या प्रगतीत सहभागी व्हावे, असे मी सर्वांना आवाहन करतो.

**लेखापरीक्षण –**

बँकेचे सन २०१८–२०१९ चे वैधानिक लेखापरीक्षण मे.पोवार सामंत आणि जाधव चार्टर्ड अकौटंट यांनी केले असून त्यांनी बँकेस ऑडीट वर्ग ''**अ**'' दिलेला आहे. लेखापरीक्षण कालावधीत त्यांनी बँकेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करून काही मौलिक सूचना केलेल्या आहेत. त्याबद्दल बँक त्यांचे अत्यंत आभारी आहे. तसेच बँकेचे ककरंट व अंतर्गत लेखापरीक्षण लेखापरीक्षकामार्फत नियमित केले जाते.

**रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची तपासणी –**

बँकेची दिनांक ३१.०३.२०१९ ई. अखेरची तपासणी रिझर्व्ह बँकेचे अधिकारी श्री.शिवपुत्र म्हेत्रे यांनी पुर्ण केले असून तपासणी कालावधीत त्यांनी बँकेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त करुन काही मौलिक सूचना केलेल्या आहेत. त्याबद्दल संचालक मंडळ त्यांचे अत्यंत आभारी आहे.

**संचालक मंडळ –**

अहवालसालात संचालक मंडळ व उपसमित्याच्या एकूण ५३ सभा झाल्या आहेत. बँकेच्या प्रगतीमध्ये धोरणातील सकारात्मक व प्रोत्साहनात्मक सहकार्य आणि सर्व निर्णय एकमताने मंजूर केलेने बँकेचे कामकाज सुरळीत व प्रगतीपथावर नेणेसाठी संचालक मंडळातील सर्व सदस्यांचे बहुमोल सहकार्य लाभले आहे.

**विशेष सर्वसाधारण सभा –**

अहवालसालात दि. २०.०३.२०१९ ई. रोजी बँक मल्टीस्टेट करणेकामी विशेष सर्वसाधारण सभा घेणेत आली होती त्यास सभासदांनी एकमतांनी मंजूरी दिली आहे.

**लाभांश –**

मा. संचालक मंडळाने अहवालसालासाठी ११ टक्के लाभांश देण्याची शिफारस केली आहे. तरी त्यास सभासदांनी मंजुरी द्यावी ही विनंती. आपल्या मंजुरीनंतर लाभांश रक्कम सभासदांच्या बचत खात्यात जमा केली जाईल. तरी ज्या सभासदांनी अद्यापही आपली बचत खाती उघडली नसतील त्यांनी ती बँकेच्या नजीकच्या शाखेत लवकरात लवकर उघडावीत.

**सभासदांना नम्र आवाहन –**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे प्रत्येक खातेदाराने बँकेत खाते उघडताना, सभासद होताना के.वाय.सी.नॉर्मची पुर्तता करणे सक्तीचे केले आहे. त्यासाठी आयडेन्टीटी साईजचे दोन फोटो, रेशनकार्ड, निवडणूक ओळखपत्र किंवा आधार कार्ड किंवा पॅन कार्ड किंवा ड्रायव्हींग लायसेन्स याची झेरॉक्स प्रत सही करुन बँकेकडे सादर करणे आवश्यक आहे. जे खातेदार सदर के.वाय.सी. नॉर्म्सची पुर्तता करणार नाहीत त्यांची खाती गोठवली जातील व त्यांना के.वाय.सी.नॉर्म्सची पुर्तता केले शिवाय कोणतेही व्यवहार करता येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**शाखाविस्तार व आधुनिकीकरण –**

बँकेचे एकूण १४ शाखेमधून कामकाज चालू आहे. सध्या कोल्हापूर, इचलकरंजी, मालगांव या नवीन शाखा करिता रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडे प्रस्ताव पाठविला आहे.

**सामाजिक उपक्रम व बांधिलकी –**

सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोनातून शिरोळ तालुक्यातील बुबनाळ, आलास, गणेशवाडी, अर्जुनवाड, शेडशाळ, दानोळी, कवठेसार, घालवाड येथील क्षारपड ठरलेल्या ७००० एकर जमिन सुधारण्यासाठी बँकेने अल्प व्याजदराने कर्जपुरवठा केला असून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास व्हावा म्हणून जांभळी, नांदणी, कोंडिग्रे व यड्राव या गावातील ३०० एकर जमिन ठिबक सिंचनाखाली येण्यासाठी कर्जपुरवठा केला आहे.

**सेवक वर्ग –**

अहवाल सालअखेर बँकेकडे एकूण ११४ सेवक आहेत. बँकेचा शाखाविस्तार व कार्य भार दिवसेंदिवस वाढतच आहे. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुभाष बाबू चौगुले व जनरल मॅनेजर श्री.व्ही.ए.कदम व श्री.डी.एस.घोरपडे यांनी सर्व कार्यभाग कार्यसक्षमपणे सांभाळले त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. ठेववाढ, कर्जवसुली व नैमित्तिक ग्राहक सेवा यामुळे कामाचा फार ताण पडत असुनही बँकेच्या सेवक वर्गाने अत्यंत विनम्र व तत्परतेने ग्राहकांची सेवा करुन सभासद व ग्राहकांशी आपुलकी व जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित केले आहेत.

ठेववृध्दी व कर्ज वसुली यांची उद्दीष्टे पूर्ण करणेसाठी त्यांनी केलेल्या अथक प्रयत्नाबद्दल मी त्यांचे आपणा सर्वांतर्फे अभिनंदन करतो. यापुढेही बँकींग क्षेत्रातील तीव्र स्पर्धा व नवनवीन आव्हानांना सामोरे जाण्यास सेवकांनी सिध्द रहावे व आपल्या बँकेचे नाव उज्वल करावे असे मी त्यांना आवाहन करतो.

**आभार व समारोप –**

बँकेच्या प्रगतीस **आदरणीय उद्यानपंडीत मा.श्री. गणपतरावजी पाटीलसाहेब (दादा)** चेअरमन, श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. शिरोळ यांचे मौलीक मार्गदर्शन मिळत असलेने मी त्यांचा शतश: ऋणी आहे. बँक आजवर जी भक्कम आर्थिक प्रगती यश संपादन करू शकली व नावलौकीक मिळविला आहे. त्याचबरोबर बँकेचे व्हाईस चेअरमन श्री. महेंद्र बागे व सर्व संचालकांचे मन:पूर्वक आभार. तसेच आपण सर्व सन्माननीय सभासद, ठेवीदार, हितचिंतक, सेवा पुरवठादार, विविध संस्था, उद्योजक, कारखानदार यांनी बँकेला सेवा करण्याची संधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करून त्या सर्वाचे आभार मानतो.

रिझर्व्ह बँकेचे अधिकारी, मा. विभागीय सहनिबंधकसो, मा. विशेष लेखापरीक्षकसो, मा. लेखापरीक्षकसो, मा.जिल्हा उपनिबधंकसो, मा असिस्टंट रजिस्ट्रार, सहकार खाते व शाखा सल्लागार, कायदा सल्लागार, व्हॅल्युएटर, बँकेचे सराफ, दि.एम.एस.सी बँक, जिल्हा मध्यवर्ती बँक, बँक फेडरेशन, बँक असोसिएशन कोल्हापूर तसेच श्री.दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि, शिरोळ. यांनी केलेले मार्गदर्शन व सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. त्याचबरोबर अहवाल सालात बँकेस योग्य प्रसिध्दी दिल्याबद्दल सर्व पत्रकार बंधूंचे मी मनस्वी आभार मानतो.

आपणा सर्वाचे वाढते प्रेम, विश्वास व सहकार्याच्या पाठबळावर बँकेचा विकास हाच ध्यास मनात कायम करीत बँकेच्या प्रगतीतील सातत्य असेच पुढे चालु राहील अशी ग्वाही देतो व माझ्या अध्यक्षीय भाषणाचा समारोप करतो व मा. संचालक मंडळाच्या वतीने बँकेचा सन २०१८–२०१९ सालाचा ताळेबंद, नफा–तोटापत्रक व अंदाजपत्रक व नफा–विभागणी आपल्या समोर सादर करत असून त्यास सभासदांनी मंजूरी द्यावी अशी विनंती करतो.

**धन्यवाद**

**।। जय हिंद ।। जय महाराष्ट्र ।। जय सहकार ।।**

आपला नम्र,
**महादेव बाबू राजमाने**
चेअरमन

स्थळ : जयसिंगपूर
दिनांक : २२ – ०८ –२०१९

# वैधानिक लेखा परिक्षकांचा शेरा

**(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अंतर्गत कलम ८१ (५-ब) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ अंतर्गत नियम ६९ (३ व ९) अन्वये द्यावयाचा.)**

आम्ही, डॉ. आप्पासाहेब उर्फ सा. रे. पाटील जयसिंगपूर उदगांव सहकारी बँक लि.,जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर या सहकारी बँकेचे तारीख ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाचे नफातोटा पत्रक व ता. ३१ मार्च २०१९ रोजीचा परिशिष्टीय ताळेबंद, संस्थेने ठेवलेली हिशोबी पुस्तके, व्हौचर्स व मला उपलब्ध करुन दिलेल्या अन्य कागदपत्रावरुन तपासले असुन आमचे वैधानिक लेखापरिक्षणाचे कामासाठी व त्याचे पुर्ततेसाठी आम्हाला आवश्यक ती माहिती व खुलासे मिळाले आहेत. त्यानुसार आमच्या मते...

१) हिशोबी पुस्तकाच्या तपासणीतून जितपत दृष्टीत्पतीस येईल त्यावरुन, संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा १९६० चे कायदा व त्याखालील नियम व संस्थेच्या पोटनियमान्वये अपेक्षीत असल्यानुसार, योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

२) आम्ही तपासलेल्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रके, संस्थेच्या हिशोबांच्या पुस्तकांशी व विवरणांशी जुळत आहेत.

३) आमच्या मते, देणेत आलेल्या माहिती प्रमाणे, तसेच आम्हाला प्राप्त झालेल्या सर्व शाखांच्या हिशोबपत्रकानुसार आणि आम्हाला देण्यात आलेल्या खुल्याशावरुन हे हिशोब महाराष्ट्र सहकारी संस्थांचा १९६० व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक ती माहिती देतात.

आमच्या लेखापरिक्षण अहवाल भाग 'अ', 'ब', 'क' व परिशिष्ठ यामध्ये नमूद केलेल्या अवलोकनास अनुसरुन

अ) ताळेबंद पत्रकाबाबत दि. ३१ मार्च २०१९ या दिवशीच्या संस्थेच्या आर्थिक परिस्थितीची व

ब) नफा-तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या आर्थिक वर्षाच्या नफ्याची सत्य व वास्तव स्थिती दर्शवित आहे.

४) सन २०१८-२०१९ या वर्षासाठी महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० खालील नियमानुसार बँकेस **''अ''** वर्ग कायम करणेत येत आहे.

**मे. पोवार सामंत आणि जाधव**
**चार्टर्ड अकौंटंट**

POWAR SAMANT & JADHAV FRN 119605W KOLHAPUR Chartered Accountants

Umesh J. Powar
Partner
Mem.No.102625

**पार्टनर**
**(पॅनेल क्र. १३११३)**

स्थळ : कोल्हापूर

दिनांक : २०/०६/२०१९

# दिनांक ३१-३-२०१९ ई चे ताळेबंद पत्रक नं. २

| दि. ३१-३-२०१८ रूपये पैसे | भांडवल व देणी | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१९ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| **१०,००,००,०००-००** | **अधिकृत भाग भांडवल** (अधिकृत भाग भांडवल १,००,००० भाग प्रत्येकी रू. १०००/- प्रमाणे) | | **१०,००,००,०००-००** |
| **६,९४,८२,८५०-००** | **वसूल भाग भांडवल** | | **८,३५,५१,६५०-००** |
| **११,७६,११,७५३.६८** | **राखीव व इतर निधी** | | **१२,८९,६३,२६३.२५** |
| ३,८१,३४,३१३-७४ | रिझर्व्ह फंड | ४,२८,७३,८७५-७७ | |
| १,२५,०३,१७५-९४ | इमारत निधी | १,३७,९०,१२३-४८ | |
| १६,००,०००-०० | लाभांश समिकरण निधी | १६,००,०००-०० | |
| ४,४७,०६,०००-०० | संशयित बुडीत कर्ज निधी | ४,५०,०६,०००-०० | |
| ५,४०,०००-०० | धर्मादाय निधी | ५,४०,०००-०० | |
| २५,००,०००-०० | गुंतवणूक तरतूद | २५,००,०००-०० | |
| ३,००,०००-०० | सेवक कल्याण निधी | ३,००,०००-०० | |
| १०,००,०००-०० | सभासद कल्याण निधी | १०,००,०००-०० | |
| २६,६०,०००-०० | गुंतवणुक घसारा निधी | २६,६०,०००-०० | |
| ३७,३०,०००-०० | उत्तम जिंदगीसाठी तरतूद | ५५,३०,०००-०० | |
| १८,८०,०४८-०० | इतर संशयीत बुडीत निधी | १८,८०,०४८-०० | |
| ३५,००,०००-०० | गुंतवणूक चढउतार निधी | ५०,००,०००-०० | |
| ३७,००,०००-०० | जनरल रिझर्व्ह फंड | ५२,००,०००-०० | |
| ५८,२१६-०० | निवडणूक निधी | ८३,२१६-०० | |
| ४,००,०००-०० | टेक्नॉलॉजी निधी | ५,००,०००-०० | |
| ४,००,०००-०० | शिक्षण निधी | ५,००,०००-०० | |
| **२,२८,८१,८१,१९९-४५** | **एकूण ठेवी** | | **२,६५,७५,३३,३६०-६९** |
| **६१,००,५३,६७६-६२** | **सेव्हिंग ठेवी** | **६२,०२,११,१७४-१८** | |
| ५७,८९,७३,१६२-१८ | १) व्यक्ती | ५७,८३,४६,७८०-४८ | |
| ३,१०,२१,६१५-७४ | २) संस्था | ४,१७,७१,२५०-३२ | |
| ५८,८९८.७० | १) सामान्य बचत खाते | ९३,१४३.३८ | |
| **७,०५,५७,६५९-४३** | **चालू ठेवी** | **८,३१,२४,११०-८५** | |
| १,९५,१४,२९७-४१ | १) व्यक्ती | ४,१२,०७,५२३-१३ | |
| ४,७८,९८,३०८-५८ | २) संस्था | ४,०७,४६,१५२-५२ | |
| ३१,४५,०५३-४४ | ३) सी.सी.मधील क्रेडीट बॅलन्स | ११,७०,४३५-२० | |
| **१,६०,७५,६९,८६३-४०** | **मुदत ठेवी** | **१,९५,४१,९८,०७५-६६** | |
| १७,५३,८५,२८६-६० | १) व्यक्ती | २३,८३,२३,७३५-२० | |
| ५१,२५,६३,०७८-०० | २) संस्था | ५४,१९,५८,५९४-०० | |
| **२,४७,५२,७५,८०३-१३** | **बेरीज पुढील पानावर** | | **२,८७,००,४८,२७३-९४** |


कोणतेही खाते उघडताना ओळखपत्र व वास्तव्याचा दाखला आवश्यक आहे.

## दिनांक ३१-३-२०१९ ई चे ताळेबंद पत्रक नं. २

| दि. ३१-३-२०१८ रूपये पैसे | मालमत्ता व येणी | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१९ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| **१७,५२,३६,४२५-८३** | **रोख शिल्लक व बँक शिल्लक** | | **१४,२१,१०,२६६-४९** |
| ३,०५,०५,३०४-७३ | हातातील रोख शिल्लक | २,८०,६६,४३४-७७ | |
| १,२९,५३,००७-४१ | बँक ऑफ इंडीया शाखा जयसिंगपूर | ३,१६,२५,१७८-०९ | |
| ११,०२,२५९-५३ | स्टेट बँक ऑफ इंडीया शाखा शिरोळ | १३,९६,९१३-६७ | |
| ६९,६६,९०१.७६ | दि एम.एस.सी. बँक लि. शाखा मुंबई | १८,८४,०९६.६५ | |
| १,०६,८८,०५४-७१ | के.डी.सी.सी बँक शाखा जयसिंगपूर | २५,४५,८९७-११ | |
| ७,८८,५३५-४४ | के.डी.सी.सी बँक शाखा इचलकरंजी | ११,६१,८९५-८४ | |
| ४९,१०,०६४-९० | के.डी.सी.सी बँक शाखा दानोळी | ७,९८,९७२-३० | |
| ४८,४९,७१७-२४ | के.डी.सी.सी बँक शाखा कुरूंदवाड | ८,२९,९६०-९३ | |
| ५,१२,९६३-५९ | के.डी.सी.सी बँक शाखा अब्दुललाट | ४,०१,३५५-९६ | |
| ५९,३०,०३२-२१ | के.डी.सी.सी बँक शाखा शिरोळ | ११,५०,६३०-१६ | |
| ३७,६४,८५९-०७ | के.डी.सी.सी बँक शाखा कवठेगुलंद | १४,३३,७५०-९५ | |
| ५६,६३,४१५-९४ | के.डी.सी.सी बँक शाखा खिद्रापूर | १८,८८,७९०-५४ | |
| १,६५,०९५-५९ | के.डी.सी.सी बँक शाखा दत्तवाड | २६,८५,६४६-०४ | |
| २,६३,२७.२६६-२५ | आय.डी.बी.आय बँक शाखा कोल्हापूर | २,१०,१९.२४८-५५ | |
| ५,९४,३४,०७७-४६ | युनीयन बँक ऑफ इंडीया शाखा जयसिंगपूर | ४,५२,२१,४९४-९३ | |
| ६,७४,८७०-०० | स्टेट बँक ऑफ इंडीया शाखा सांगली | ०-०० | |
| **९,७४,२४,१७९-३६** | **इतर बँकातील शिल्लक** | | **११,९४,८०,७२५-९०** |
| ५,३५,१९३-४५ | आय.सी.आय.सी.आय बँक लि.आधार खाते | ८,१०,२५८-४९ | |
| ५,९६,०४,७६३-०८ | आय.सी.आय.सी.आय बँक लि. चालू खाते | ७,४९,५०,५३६-८१ | |
| २,००,०००-०० | आय.सी.आय.सी.आय बँक लि.एनपीसीआय खाते | ६७,८३,००१.०६ | |
| ०-०० | आर.बी.एल.बँक लि. शाखा जयसिंगपूर | १,६६,७३९-०० | |
| ३,५१,००,०१३.७३ | एस बँक शाखा कोल्हापूर | ३,६५,६०,६४३-०४ | |
| ०-०० | एच.डी.एफ.सी.बँक लि.शाखा जयसिंगपूर | ३८,६७६-४० | |
| १९,८४,२०९-१० | दि. फेडरल बँक लि. शाखा जयसिंगपूर | १,७०,८७१-१० | |
| **१,१५,४४,५५,९३३-३७** | **एकूण गुंतवणुक** | | **१,१२,४७,८२,३८६-९७** |
| **१६,४३,५०,०००-००** | **मुदत बंद ठेवी** | **९,५८,५०,०००-००** | |
| १०,००,०००-०० | के.डी.सी.सी बँक शाखा इचलकरंजी | ९,३५,००,०००-०० | |
| २३,५०,०००-०० | लॉर्ड बालाजी बँक शाखा सांगली | २३,५०,०००-०० | |
| ५,००,००,०००-०० | एस बँक शाखा कोल्हापूर | ०-०० | |
| २,००,००,०००-०० | आय.सी.आय.सी.आय बँक शाखा जयसिंगपूर | ०-०० | |
| **१,४२,७१,१६,५३८-५६** | **बेरीज पुढील पानावर** | | **१,३८,६३,७३,३७९-३६** |

## दिनांक ३१-३-२०१९ ई चे ताळेबंद पत्रक नं. २

| दि. ३१-३-२०१८ रूपये पैसे | भांडवल व देणी | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१९ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| **२,४७,५२,७५,८०३-१३** | **मागील पान बेरीज** | | **२,८७,००,४८,२७३-९४** |
| ८८,३९,६४९-०० | ३) दामदुप्पट ठेव | ९६,५४,४५४-०० | |
| ६,८५,७८६-४० | ४) लखपती ठेव | ०-०० | |
| ६१,८४,६५,६४३-३० | ५) पुर्नगुंतवणुक ठेव | ८८,९३,२३,१२९-७० | |
| ७,८०,७४,०२७-०० | ६) संकल्पपूर्ती ठेव | ४५,३०,२८३-०० | |
| १०,७९,७३,६७४-३० | ७) मुदत बाह्य ठेवी | १०,७५,००,७२४-२० | |
| २,९९,९१,३५८-०० | ८) अल्पबचत ठेव | २,९२,७२,३१३-१६ | |
| ३८,८४,८७५-८० | ९) रिकरिंग ठेव | ४०,३४,५२२-०० | |
| ३,८०,१३१-०० | १०) सिध्दीपुर्ती ठेव | ०-०० | |
| ७,१३,०६.३५४-०० | ११) सिध्दी विनायक ठेव | १३,५७,३६९-०० | |
| २०,०००-०० | १२) लॉकर ठेव | ९०,०००-०० | |
| ०-०० | १३) धनलक्ष्मी व्यक्ती | ७,२५,८८,८०८-४० | |
| ०-०० | १४) धनलक्ष्मी संस्था | ५,५५,६४,१४३-०० | |
| **४,३४,६८,६१८-००** | **देणे व्याज** | | **३,०४,३७,६४८-००** |
| **४,२७,४८,८८१.७४** | **इतर देणी** | | **४,७८,६९,६१४.९९** |
| ८,७७,१७८-०० | मागणी न केलेला लाभांश | ७,४२,३८६-०० | |
| २,४४,४३,०७९-०६ | अनामत खाते | २,७६,००,९६६-१२ | |
| २,०३,८००-०० | शेअर्स अनामत | ०-०० | |
| ११,५२,७३८-०० | ऑडीट फी | ८,७५,४१८-०० | |
| ६३,५८५-०० | मुदत बाह्य चेक/डी.डी. | ६३,५८५-०० | |
| ४,१३०-०० | पे ऑर्डर | ०-०० | |
| १५,३१५-०० | टेलीफोन बिल देणे | २३,७५०-०० | |
| ३३,३२८-०० | दिवाबत्ती देणे | ३७,१००-०० | |
| २५,०१,३२७-६४ | इतर देणी | १६,५९,८५१-७९ | |
| २९,०२,७९६-०० | बोनस देणे | ४५,९२,७७९-०० | |
| १३,८८३-०० | सरचार्ज देणे | ५९,४९८-५६ | |
| ९६,००,०००-०० | आयकर तरतूद | १,००,००,०००-०० | |
| २,२५९-०० | पगार देणे | ०-०० | |
| २,९५,००३-०० | टी.डी.एस. | १०,९५,४९६-०० | |
| ७५,०००-०० | ऑफिस भाडे देणे | ०-०० | |
| १,१२,९०८-०० | सिक्युरीटी ठेव | २,३१,७९०-०० | |
| २,२६,२६४-८२ | सी.जी.एस.टी. देणे | ४,४३,३३३-४७ | |
| २,२६,२५३-४७ | एस.जी.एस.टी. देणे | ४,४३,३३३-४७ | |
| ३३-७५ | आय.जी.एस.टी. देणे | ३२७-५८ | |
| **२,५६,१४,९३,३०२-८७** | **बेरीज पुढील पानावर** | | **२,९४,८३,५५,५३६-९३** |

# दिनांक ३१-३-२०१९ ई चे ताळेबंद पत्रक नं. २

| दि. ३१-३-२०१८ रूपये पैसे | मालमत्ता व येणी | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१९ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| **१,४२,७१,१६,५३८-५६** | **मागील पान बेरीज** | | **१,३८,६३,७३,३७९-३६** |
| ९,१०,००.०००-०० | स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा शिरोळ | ०-०० | |
| ३९,८६,८३,०००-०० | **ट्रेझरी बिलामधील गुंतवणुक** | ३९,८३,३०,३५०-०० | |
| **५९,१३,११,८८३-३७** | **सरकारी कर्जरोखे गुंतवणुक** | **६३,०४,९०,९८६-९७** | |
| **१,११,०५०-००** | **शेअर्स** | **१,११,०५०-००** | |
| १०,०००-०० | दि एम.एस.सी. बँक लि., मुंबई | १०,०००-०० | |
| १,००,९५०-०० | के.डी.सी.सी बँक लि., कोल्हापूर | १,००,९५०-०० | |
| १००-०० | महाराष्ट्र राज्य ग्रामीण विकास बँक मुंबई | १००-०० | |
| **१,०८,४७,६८,३४५-१०** | **एकूण कर्जे** | | **१,५०,९६,१८,१२४-८२** |
| **४३,३९,४६,४८९-६६** | **अल्प मुदतीची कर्जे पैकी** | **५८,१९,२९,४०९-८७** | |
| ४२,६९,९८,०५८-०४ | अ) तारणी | ५७,२५,४१,५४७-३३ | |
| ६९,४८,४३१-६२ | ब) विनातारणी | ९३,८७,८६२-५४ | |
| **४०,८७,१०,१४२-५९** | **मध्यम मुदतीची कर्जे पैकी** | **५४,७४,६१,१७४-२१** | |
| ३९,५४,२१,८९७-०५ | अ) तारणी | ५१,४९,६२,६६५-५१ | |
| १,३२,८८,२४५-५४ | ब) विनातारणी | ३,२४,९८,५०८-७० | |
| **२४,२१,११,७१२-८५** | **दिर्घ मुदतीची कर्जे पैकी** | **३८,०२,२७,५४०-७४** | |
| २४,२१,११,७१२-८५ | अ) तारणी | ३८,०२,२७,५४०.७४ | |
| ०.०० | ब) विनातारणी | ०.०० | |
| **२,९०,६९,२३४-६२** | **स्थावर मालमत्ता** | | **३,०८,१२,०९७-१५** |
| १,०८,१५,०३३-०० | जागा व इमारत | १,०४,२९,५३४-०० | |
| ३९,८०,३८८-९५ | कॉम्प्युटर डेडस्टॉक | ७१,४२,२४९-६० | |
| १,३०,९९,१७४-६७ | डेडस्टॉक | १,२२,९५,६११-५५ | |
| ३५,५३३-०० | लायब्ररी | ३३,४२०-०० | |
| ११,३९,१०५-०० | वाहन | ९,११,२८२-०० | |
| **२,२६,२७,००६-१२** | **इतर येणी** | | **२,४५,२४,१४१-९५** |
| ३२,२५५-०० | लाईट डिपॉझीट | ३२,२५५-०० | |
| ९,०८६-०० | फोन डिपॉझीट | ११,४८४-०० | |
| ५,२७५-०० | लवाद डिपॉझीट | ५,२७५-०० | |
| **२,५६,३५,८१,१२४-४०** | **बेरीज पुढील पानावर** | | **२,९५,१३,२७,७४३-२८** |

# दिनांक ३१-३-२०१९ ई चे ताळेबंद पत्रक नं. २

| दि. ३१-३-२०१८ रूपये पैसे | भांडवल व देणी | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१९ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| २,५६,१४,९३,३०२-८७ | **मागील पान बेरीज** | | २,९४,८३,५५,५३६-९३ |
| १,९८,०३,७९६-९६ | **उलट बाजूप्रमाणे** | | २,८६,०६,८५१-१९ |
| १,९३,५४,७४६-४९ | थकीत एन पी ए तरतूद | २,८२,०४,२७४-४७ | |
| ७०,०००-०० | गॅरंटी इश्यूड | २०,०००-०० | |
| ३,७९,०५०-४७ | डीइएएफ आरबीआय येणे खाते | ३,८२,५७६-७२ | |
| १,५०,२७,३३१-५४ | **निव्वळ नफा** | | १,६०,५७,३९९-०९ |
| २,५९,६३,२४,४३१-३७ | **एकूण** | | २,९९,३०,१९,७८७-२१ |

तपासले शेऱ्यास पात्र राहून बरोबर आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **श्री. दिपक एस. घोरपडे** | **श्री. विनायक आ. कदम** | **श्री. सुभाष बाबू चौगुले** | **मे. पोवार, सामंत आणि जाधव** |
| जनरल मॅनेजर | जनरल मॅनेजर | मुख्य कार्यकारी अधिकारी | चार्टर्ड अकौटंट<br>शासकीय लेखापरिक्षक |

# दिनांक ३१-३-२०१९ ई चे ताळेबंद पत्रक नं. २

